आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२३ मे २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- मान्सूनपूर्व पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळेल असं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- विकसित भारतासाठी ईशान्येकडच्या राज्यांचा विकास आवश्यक असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- ऑपरेशन सिंदूरमध्ये तीन हजार अग्निवीरांनी बजावली महत्त्वाची कामगिरी

- गडचिरोली जिल्ह्यात सीमावर्ती भागातल्या जंगलात सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार

- राज्याच्या बहुतेक भागात मान्सूनपूर्व पावसाचा जोर/ तळकोकणात रेड अलर्ट तर इतर १० जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

**आणि**

- खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राची ४ सुवर्ण, ४ रौप्य आणि ६ कास्य पदकं मिळवून अव्वल स्थानी झेप

**<><><><><>**

मान्सूनपूर्व पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळेल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं. कोल्हापूर विमानतळावर ते प्रसारमाध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

पुण्यातल्या वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणासंदर्भात पत्रकारांनी विचारलं असता ते म्हणाले की या प्रकरणी दोन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. याप्रकरणी मोक्का लावण्याकरिता नियम पहावे लागतील, मात्र कायद्यातून कोणीही सुटणार नाही याची काळजी घेऊ, असं आश्वासन त्यांनी दिलं.

इचलकरंजी विधानसभा मतदारसंघात ७०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज झालं.

**<><><><>**

विकसित भारतासाठी ईशान्येकडच्या राज्यांचा विकास आवश्यक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.  ईशान्येकडच्या राज्यांमधे गुंतवणुकीच्या संधी उलगडून दाखवणाऱ्या उदयोन्मुख ईशान्य भारत गुंतवणूकदार परिषदेचं उद्घाटन आज प्रधानमंत्र्यांच्या  हस्ते  झालं. त्यावेळी ते बोलत होते. ईशान्येकडच्या राज्यांमधे निसर्गाचं जतन आणि संवर्धन लोकपरंपरेनं केलं असून तिथलं आरोग्यदायी वातावरण गुंतवणुकदारांसाठी एक आकर्षण असल्याचं ते म्हणाले...

**होल्ड- बाईट-- प्रधानमंत्री**

ईशान्येकडच्या राज्यांमधे पायाभूत सोयीसुविधांचा विकास झाला असल्याचं ईशान्य क्षेत्र विकास विभागाचे केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी सांगितलं. या परिसरात १७ विमानतळ आणि दोन हजाराहून अधिक विमान उड्डाण सेवा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं  येत्या १५ दिवसांत ३२ वेगवेगळ्या देशांना भेटी देणार आहेत.

भारत दहशतवादी हल्ल्यांना तोंड देत असताना रशियाशी संपर्क राखणं अत्यंत महत्त्वाचं आहे. असं प्रतिपादन  द्रमुक खासदार **कनिमोळी करुणानिधी** यांनी **रशियाची** राजधानी मॉस्को इथं आज माध्यमांशी बोलताना केलं. **कनिमोळी** यांच्या नेतृत्वाखालचं  शिष्टमंडळ आज मॉस्को इथं  पोहोचलं. हे शिष्टमंडळ यानंतर स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटवियाला भेट देईल.

जनता दलाचे खासदार **संजय झा** यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाने जपानची राजधानी टोकियो इथं ब्राझील, ऑस्ट्रेलिया, कोलंबिया, ग्रीस आणि दक्षिण कोरियाच्या राजदूतांशी संवाद साधला. शिवसेना खासदार **डॉ. श्रीकांत शिंदे** यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं दहशतवादाविरुद्ध भारताच्या भूमिकेवर भर देण्यासाठी संयुक्त अरब अमिराती मधल्या उच्चाधिकाऱ्यांबरोबर अनेक उच्चस्तरीय बैठका घेतल्या. खासदार बैजयंत पांडा, खासदार शशी थरूर आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालची इतर तीन शिष्टमंडळं उद्या, तर खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ परवा विविध देशांच्या दौऱ्यावर रवाना होणार आहे. परराष्ट्र सचिव **विक्रम मिस्त्री** आज संध्याकाळी बहुपक्षीय खासदार शिष्टमंडळांना त्यांच्या परदेश दौऱ्यांपूर्वी माहिती देतील.

**<><><><><>**

गेल्या दोन वर्षांत अग्निपथ योजनेंतर्गत भरती करण्यात आलेल्या तीन हजार अग्निवीरांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यांनी पाकिस्तानी क्षेपणास्त्रं आणि ड्रोन हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर दिलं.

हवाई संरक्षण दलात तैनात असणाऱ्या दोनशेहून अधिक अग्निवीरांनी पश्चिम आघाडी धैर्यानं आणि दृढनिश्चयानं सांभाळली. त्यांनी पेचोरा, शिल्का, ओएसके - एके क्षेपणास्त्रं आणि मध्यम पल्ल्याची जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रं प्रणाली चालवली. तसंच त्यांनी संपर्क व्यवस्था आणि आकाश आणि इतर क्षेपणास्त्रं वाहून नेण्यासाठी आणि डागण्यासाठी वापरली जाणारी वाहनं चालवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरबद्दल नागरिक सेनादलांप्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त करत आहेत. आता ऐकू या रत्नागिरी जिल्ह्यातल्या नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ….

**होल्ड बाईट -**

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातल्या ब्राह्मणवाडा गावाचे संदीप पांडुरंग गायकर भारतीय सैन्याच्या १५ मराठा बटालियनमध्ये सेवा बजावत असताना जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांशी लढताना शहीद झाले.
त्यांच्या पार्थिवावर उद्या अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुका आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातल्या जंगलात आज नक्षलवादी आणि पोलिसांत चकमक झाली. या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार झाले. भामरागड तालुका आणि छत्तीसगड सीमेवर कवंडे गावात नक्षलवादी लपून असल्याची माहिती मिळाल्यावरुन संयुक्त शोध मोहिम सुरू होती. त्या दरम्यान आज सकाळी  नक्षलवाद्यांनी पोलिसांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरात सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात चार नक्षलवादी मारले गेले.  चकमक सुमारे दोन तास सुरू होती. चकमक थांबल्यानंतर घटनास्थळाची पाहणी केली असता मोठा शस्त्रसाठा हाती लागला. दरम्यान, मारले गेलेले नक्षलवादी हे उपकमांडर दर्जाचे असून अद्याप त्यांची ओळख पटली नसल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली. छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात किस्ताराम इथं नक्षलवादी आणि सुरक्षा दलात काल संध्याकाळी झालेल्या चकमकीत एक नक्षलवादी मारला गेला.

**<><><><><>**

राज्यात बहुतेक जिल्ह्यांमध्ये दमदार पावसानं हजेरी लावली आहे. रत्नागिरी आणि सातारा या दोन जिल्ह्यांसाठी हवामान विभागानं आज रेड अलर्ट जारी केला आहे. रत्नागिरीत विजा आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची, तर साताऱ्यातही वादळी वारे, विजा आणि जोरदार पावसाची शक्यता आहे. ठाणे,

कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रायगड, पुणे, अहमदनगर, बीड, परभणी, लातूर, नांदेड आणि चंद्रपूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. उद्यासाठी रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे, तर मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाण्यासह आसपासच्या जिल्ह्यांना, तसंच बुलडाणा, यवतमाळ आणि चंद्रपूरला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईत आज सकाळपासून वातावरण ढगाळ असून अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी येत आहेत.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात आज सलग चौथ्या दिवशीही पाऊस सुरूच आहे. आज सकाळी आठ वाजता संपलेल्या २४ तासांमध्ये गुहागर तालुक्यात सर्वाधिक १९० मिलिमीटर पाऊस पडला.

**<><><><><>**

दीवच्या घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत ४ सुवर्ण, ४ रौप्य आणि ६ कास्य पदकांसह १४ पदकांची लयलूट करत महाराष्ट्राने प्रथम स्थानावर झेप घेतली आहे. कालच्या तिसऱ्या दिवशी ५० ते ५५किलो वजनी गटात जयश्री शेटे हिने सुवर्ण कामगिरी केली. रामचंद्र बदक आणि सचिन गर्जे, ओंकार अभंग, वैभव काळे आणि अंशुल कांबळे यांनी आपापल्या गटात रौप्य पदकं पटकावली.

**<><><><><>**